# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १७९/२०१७

संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक, विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राध्यापक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३२(३)(च)(32(3)(f)) मधील तरतुदीनुसार ज्यांना राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) किंवा यथास्थिती राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळ यांचेकडून अधिस्वीकृती मिळालेली आहे, अशा महाविद्यालयाचे आठ प्राचार्य (पैकी १ महिला व १ आळीपाळीने अ.जा. किंवा अ.ज. किंवा. वि.जा.भ.ज. किंवा इ.मा.व. प्रवर्गातील), दोन प्राध्यापक (पैकी १ आळीपाळीने अ.जा. किंवा अ.ज. किंवा. वि.जा.भ.ज. किंवा इ.मा.व. प्रवर्गातील) व एक मान्यताप्राप्त परिसंस्थेचे प्रमुख यांचे शोध समितीच्या शिफारशीनुसार विद्यापरिषदेवर सदस्य म्हणून मा. कुलगुरू, मा. कुलपती यांच्याशी विचारविनिमय करुन नामनिर्देशन करणार आहेत. यासाठी मा. कुलगुरू यांनी शोध समिती घटित केलेली आहे.

दि. २८ एप्रिल, २०१७ च्या राजपत्रान्वये शासनाने विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठीच्या पात्रता शर्ती विहित केलेल्या असून सदर पात्रता शर्ती पूर्ण करीत असलेले संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक, विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राध्यापक यांना आवाहन करण्यात येते की, विद्यापरिषदेवर सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्याकरिता विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.

उक्त नामनिर्देशनासाठी अर्ज सादर करण्यापूर्वी अर्जदार हे दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजीच्या राजपत्रान्वये विहित केलेल्या सर्व पात्रता शर्ती पूर्ण करतात, याची संबंधितांनी खात्री करावी. सदर राजपत्र विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statute या लिंकवर उपलब्ध आहेत.

तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन, **शनिवार, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ ते सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा. तसेच सदर अर्जाची छापील प्रत (प्रिंट आऊट) आवश्यक त्या कागदपत्रांसह **गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७** पर्यंत कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत **सकाळी १०.२० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावी.

विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे, विहित पात्रता शर्ती पूर्ण न करणारे, अपुरे इत्यादी प्रकारचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

16/8/17

**(डॉ. अरविंद दिगंबर शाळीग्राम)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
संदर्भ क्र. : साफुपुविनि/९५
दिनांक : १८/०८/२०१७

D:\Election 2017\Shodh Samitee(Search Committee)\Circular.docx